ePaper

ZP निवडणुकांआधीच महायुतीत रस्सीखेच, भाजप विरुद्ध शिवसेना असा सामना रंगणार?

| वर्ष - 9 | अंक -23 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज ™

## आतील पानांत


- बांगलादेशची विजयी सलामी!
- आशिया चषकात मिळाली नाही संधी
- भारताशी व्यापार करार करणार नाही?
- सगळे सडके आंबे आत्ताच बाहेर फेका


www.mahaenews.com | शनिवार, दि. 13 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## झेडपीचा धुरळा: 34 जिल्हा परिषदांमध्ये अध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर

# 17 जिल्ह्यांत महिलाराज!

## ग्रामविकास विभागाद्वारे जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर

**| मुंबई | प्रतिनिधी |**
**महाईन्यूज**

राज्यात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पार पडणार आहे. यासाठी राजकीय पक्षांसह आता निवडणूक आयोगानेही तयारीला सुरुवात केल्याचे दिसत आहे. आयोगाकडून जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे आता राजकीय पक्षांना आपापली रणनीती तयार करण्यास मदत होणार आहे. आता आगामी काळात लवकरच जिल्हा परिषद निवडणुकांचे वेळापत्रकही जाहीर होण्याची शक्यता आहे. प्रदीर्घ काळानंतर राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली असून लवकरच होणाऱ्या या निवडणुकांसाठी ग्रामविकास विभागाने शुक्रवारी जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर केले. यानुसार ठाणे, रत्नागिरी, धुळे, अहिल्यानगर, सांगली, कोल्हापूर, लातूर, वाशीम आदी १७ जिल्हा परिषदांमध्ये महिलाराज येणार आहे.




इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या मुद्द्यांवरून जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ६ मे रोजीच्या आदेशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया चार महिन्यांत सुरू करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले. त्यानुसार आयोगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरू केली आहे.

ग्रामविकास विभागाने यापूर्वी ३० सप्टेंबर २०२२ रोजी राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांचे आरक्षणजाहीर केले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे अनेक जिल्हा परिषदांच्या निवडणुकाच झाल्या नाहीत. त्यामुळे ज्या जिल्हा परिषदांमध्ये निवडणुकाच झाल्या नाहीत, तेथील ३० सप्टेंबर २०२२ चे आरक्षण रद्द करण्यात आले असून आता विविध प्रवर्गांनुसार नव्याने आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यानुसार रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ या जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपद खुले असेल.

महिलांसाठी किती जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपद राखीव?

राज्य सरकारने स्थानिक स्वराज्या संस्थांच्या निवडणूकीत महिलांसाठी 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे आज जाहीर 34 पैकी 18 जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपद महिलांसाठी राखीव असणार आहे. यात ठाणे, कोल्हापूर, सांगली, घाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, अहिल्यानगर, अकोला, वाशीम, बीड, चंद्रपूर, रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, नांदेड या जिल्हा परिषदांमध्ये अध्यक्षपद महिलांसाठी राखीव असणार आहे.

### ओबीसी समाजासाठी किती जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपद राखीव?

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या आरक्षणामध्ये ओबीसींसाठी 34 पैकी 9 जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद राखीव ठेवण्यात आले आहे. यात सोलापूर, हिंगोली, नागपूर, भंडारा, रत्नागिरी (महिला), धुळे (महिला), सातारा (महिला), जालना (महिला), नांदेड (महिला) या जिल्हा परिषदांचा समावेश आहे. त्यामुळे आगामी काळात वरील जिल्हा परिषदांचे अध्यक्ष हे ओबीसी प्रवर्गातील असणार आहेत.

अनुसुचित जाती आणि जमाती

अनुसुचित जमातीसाठी पालघर, नंदूरबार, अहिल्यानगर (महिला), अकोला (महिला), वाशीम (महिला) या पाच जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद राखीव ठेवण्यात आले आहे. तसेच अनुसुचित जातींसाठी परभणी, वर्धा, बीड (महिला), चंद्रपूर (महिला) या 4 जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद राखीव असणार आहे.

## जिल्हा परिषद अध्यक्षपद आरक्षण

**अनुसूचित जाती :** बीड (महिला), परभणी, वर्धा, चंद्रपूर (महिला)
अनुसूचित जमाती : पालघर, नंदुरबार, अहिल्यानगर (महिला), अकोला (महिला), वाशीम (महिला)
**नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) :** रत्नागिरी (महिला), धुळे (महिला), सातारा (महिला), सोलापूर, जालना (महिला), हिंगोली, नांदेड (महिला), नागपूर, भंडारा
**सर्वसाधारण :** ठाणे (महिला), रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, सांगली (महिला), कोल्हापूर (महिला), छत्रपती संभाजीनगर, धाराशिव (महिला), लातूर (महिला), अमरावती (महिला), बुलढाणा, यवतमाळ, गोंदिया (महिला), गडचिरोली (महिला).



अष्टविनायकांच्या मंदिर परिसर विकासकामे

अजित पवार यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

# अष्टविनायक मंदिरांची कामे दर्जेदार व्हावीत!

## मंदिरांच्या मूळ स्ट्रक्चरला कोणताही धक्का न लावता प्रत्येक कामाला ऐतिहासिक टच द्यावा

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रासह देशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायकांच्या मंदिर परिसरात सुरू असणारी विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत. या विकास आराखड्यांतर्गत काम करताना मंदिरांच्या मूळ स्ट्रक्चरला कोणताही धक्का न लावता प्रत्येक कामाला ऐतिहासिक टच द्यावा,' अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.**





श्री अष्टविनायक मंदिर परिसर विकास आराखडा कामांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आढावा बैठक घेण्यात आली. या वेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुण्यातील पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालयाचे सहायक संचालक विलास वाहणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे; तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, 'राज्यातील अष्टविनायकांपैकी मयुरेश्वर (मोरगाव), चिंतामणी (थेऊर), विघ्नेश्वर (ओझर), महागणपती (रांजणगाव), वरदविनायक (महड), सिद्धिविनायक (सिद्धटेक) आणि बल्लाळेश्वर (पाली) या मंदिरांच्या परिसरात सुरू असणारी विकासकामे वेळेत व दर्जेदार पद्धतीने करण्यात यावीत. मंदिराच्या मूळ स्ट्रक्चरला कोणताही धक्का न लावता काम करण्यात यावे. अष्टविनायक मंदिर परिसरात राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना पर्यायी जागा देऊन त्यांचे योग्य पुनर्वसन करण्यात यावे. मूळ मंदिराशी विसंगत ठरणारी बांधकामे काढून टाकून आपत्कालीन स्थितीत मंदिर परिसरात रुग्णवाहिकेसह अग्निशमन गाड्या सहज जाऊ शकतील अशी व्यवस्था ठेवावी.'

पर्यटनाच्या दृष्टीने राज्याला प्रचंड संधी असून, पर्यटनाची अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची वेळ आली आहे. केरळ, ओडिशा यांसारख्या राज्यांच्या धर्तीवर विदेशी पर्यटक, परराज्यातील भाविक आणि नवी पिढीला आकर्षित करण्यासाठी आधुनिक सोयीसुविधा, उच्च दर्जाच्या सेवा व पर्यटनाभिमुख उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे आदेशही त्यांनी या वेळी दिले.

### 'सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करा'

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पुण्यातील चांदणी चौक ते जांभूळवाडी आणि जैन वसतिगृह बकोरी फाटा ते बकोरी या दोन्ही रस्त्यांच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल एका महिन्याच्या आत तयार करावा, असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. पुणे महापालिकेने या दोन्ही रस्त्यांच्या भूसंपादनासाठी जमीनधारकांसोबत तातडीने बैठक घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. चांदणी चौक ते जांभूळवाडी, जैन वसतिगृह बकोरी फाटा ते बकोरी रस्ता, वाघोली ते केसनंद, वाघोली ते आव्हळवाडी या रस्त्यांच्या कामासंदर्भात मंत्रालयात उपमुख्यमंत्री पवार यांच्या दालनात बैठक घेण्यात आली.

# सातारा गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत हालचाली

## शिवेंद्रराजे भोसले यांची विभागीय आयुक्त, पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांशी पुण्यात चर्चा

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सातारा गॅझेटचा अभ्यास करून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात मराठा उपसमितीचे सदस्य, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या सूचनेनुसार ही चर्चा झाली.**



ही बैठक अधिकृत नव्हती. सातारा गॅझेटची कार्यवाही करण्यासंदर्भात अनौपचारिक चर्चा करण्यात आल्याचा दावा शिवेंद्रराजे भोसले यांनी करत या संदर्भात माहिती देण्यास नकार दिला. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी काही दिवसांपूर्वी मुंबई येथे मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले होते. त्या वेळी आंदोलकांच्या काही मागण्या राज्य शासनाने मान्य केल्या होत्या. तसेच हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी करण्यासही मान्यता दिली होती. मात्र, त्याचबरोबर सातारा गॅझेटची अंमलजबावणी करावी, अशी मागणी मराठा समाजाकडून होत आहे. त्यानंतर मराठा आरक्षणासंदर्भात राज्य शासनाने स्थापन केलेल्या मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पुणे विभागीय आयुक्तांना काही सूचना केल्या होत्या. सातारा गॅझेटचा अभ्यास करून त्या संदर्भातील कार्यवाहीसंदर्भात अहवाल देण्याचेही विभागीय आयुक्तांना सांगण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर समिती सदस्य शिवेंद्रराजे भोसले यांनी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची शुक्रवारी भेट घेतली.

### अंमलबजावणी करण्याची मागणी

**काही दिवसांपूर्वी मुंबईत मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले होते**

**आंदोलकांच्या मागण्या मान्य करताना शासनाने हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी मान्य केली**

**त्याचबरोबर सातारा गॅझेटची अंमलबजावणी करण्याची मागणीही जोर धरत आहे**

### पुण्यात अनौपचारिक बैठक

'ही अधिकृत बैठक नव्हती. उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांनी आयुक्तांशी चर्चा करून काही माहिती घेण्याची सूचना केली होती. त्यानुसार माहिती घेण्यात आली. ही बैठक अनौपचारिक होती. त्यामुळे बैठकीतील तपशील उघड करता येणार नाही. माहिती देण्याचा आणि बैठक घेण्याचा अधिकार उपसमिती अध्यक्षांना आहे. समिती सदस्यांना नाही. त्यामुळे या विषयावर भाष्य करता येणार नाही,' असे शिवेंद्रराजे भोसले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

लष्करी हद्द

## देहूरोडबाबत निर्णय; संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील रस्ता

# पालखी मार्गाचे काम महापालिका करणार!

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची ग्रामस्थांना माहिती

। देहूरोड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील देहूरोड लष्करी हद्दीतील देहूरोड-अशोकनगर -चिंचोली ते झेंडेमळा दरम्यानच्या दुरवस्था झालेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी ग्रामस्थ करत आहेत. या मागणीसाठी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची भेट घेतली..**



दरम्यान, रस्त्याचे महापालिकेकडून दुरुस्ती व डांबरीकरण करण्याबाबत निर्णय घेतल्याचे जिल्हाधिकाऱ्यांकडून शिष्टमंडळास सांगण्यात आले. श्री क्षेत्र देहू-देहूरोड पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांच्यासमवेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची पुण्यात भेट घेतली. डुडी यांना दिलेल्या निवेदनानुसार, देहूरोड कॅन्टोन्मेंट हद्दीतून संत तुकाराम महाराज पालखी मार्ग भाविक आणि वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा बनलेला आहे. रस्त्याची डागडुजी करण्याला देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डनेही नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

आषाढी वारी पालखी प्रस्थानाच्या पूर्वी पाऊस सुरू झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्याची पूर्ण दुरुस्ती व डांबरीकरण झालेले नाही. परिणामी, गेल्या ४ महिन्यांत देहूरोड ते झेंडेमळा या 3 किमी भागात २०० हून अधिक धोकादायक खड्डे पडले आहेत.

> “ पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून कॅन्टोन्मेंट हद्दीतील पालखी मार्ग लवकरच दुरुस्ती व डांबरीकरण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. लवकरच कार्यवाही सुरू होणार आहे.
>
> **-जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे

### ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये कार्तिकी वारी- यात्रा

येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात (कार्तिक वारी) कार्तिकी यात्रा असल्याने लाखो वारकरी व भाविक या मार्गाने ये-जा करतील. त्यामुळे लवकरात लवकर या रस्त्याच्या डागडुजीसह संपूर्ण डांबरीकरण करणे गरजेचे असल्याचे माजी मंत्री बाळा भेगडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

### वाहनचालक त्रस्त

तळवडे आयटी पार्क, चाकण व तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी, अभियंते व कामगार नियमित या मार्गाने ये-जा करीत असतात. खड्डेमय व अरुंद रस्ते, अपघात व वाहतूक कोंडीचे वाढते प्रमाण यामुळे वारकरी, भाविक, कामगार अस्त झाले आहेत.

# झोपडपट्टीतून तब्बल ₹७६.८३ लाख सेवा कर वसूल!

## झोपडपट्टीवासियांचा सेवाकर भरण्यासाठी मोठा प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत शहरात महिलांना केंद्रस्थानी ठेवून एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत ‘सारथी सोनचीरैया’ शहर उपजीविका केंद्राशी संलग्न व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फत झोपडपट्टीवासियांना सेवाकर बिलांचे वितरण आणि मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित केली जात आहे. या उपक्रमांतर्गत मार्च २०२५ पासून सेवाकर बिलांचे वितरण सुरू झाले असून तेव्हापासून आतापर्यंत झोपडपट्टीवासियांनी चांगला प्रतिसाद देत जवळपास ७६ लाख ८३ हजार ३९७ रुपयांचा विक्रमी सेवाकर जमा केला आहे.**

झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांच्या कुटुंबांना आर्थिक बळकटी मिळत आहे. आज या महिला सेवाकर बिलांचे वितरण करण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल ॲपच्या सहाय्याने माहिती देखील संकलित करीत आहेत. या उपक्रमामुळे झोपडपट्टी भागातील महिलांना रोजगार मिळाल्याने त्यांचा




> “ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत ‘सारथी सोनचीरैया’ शहर उपजीविका केंद्राशी संलग्न महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फत झोपडपट्टीवासियांना सेवाकर बिलांचे वितरण करण्यात येत आहे. महिलांना केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे महसुलवाढीसह महिलांचे सबलीकरण घडत आहे. तसेच सेवाकर वेळेवर भरून झोपडपट्टीवासियांचे देखील या उपक्रमाला चांगले सहकार्य मिळत आहे.
>
> **–-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

> “ पिंपरी चिंचवड महापालिकेने सेवाकर बिलांसाठी राबवलेला हा उपक्रम हा एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेने सेवाकर बिल वाटपासाठी राबवलेला पहिलाच उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे झोपडपट्टी क्षेत्रांतील सर्वेक्षण, सेवाकर बिलांचे वितरण कामांमध्ये महिला बचत गटांचा सहभाग महत्त्वाचा ठरत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेमुळे रोजगार निर्मितीबरोबरच नागरिकांमध्ये सेवाकर भरण्याबाबत जागरूकता वाढत आहे.
>
> **–अण्णा बोदडे,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

### गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत विक्रमी वसुली

झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाकडे सेवाकराच्या माध्यमातून आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ३९ लाख ८ हजार २१ रुपये व आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २९ लाख ७७ हजार ६६८ रुपये महसूल जमा झाला होता. मार्च २०२५ मध्ये महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फत झोपडपट्टीवासियांना सेवाकर बिलांचे वितरण सुरू झाले. त्यानंतर वेळेत बिल मिळाल्याने १७ मार्च २०२५ ते ३१ मार्च २०२५ याकाळात जवळपास १९ लाख ३ हजार ४२९ रुपयांचा सेवाकर वसूल झाल्याने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सेवाकराच्या माध्यमातून जमा होणाऱ्या महसुलात मोठी वाढ झाली. आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये वसूल झालेला सेवाकर ४५ लाख ५४ हजार ७०७ रुपये आहे. तर, १ एप्रिल २०२५ पासून म्हणजेच आर्थिक वर्ष २०२५-२६ सुरू झाल्यापासून आतापर्यंत जवळपास ५७ लाख ७९ हजार ६७० रुपये महसूल जमा झाला आहे. गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत सेवाकर वसुलीची ही आकडेवारी विक्रमी आहे.

समाजातील दर्जा उंचावत असून त्यांच्या योगदानामुळे कुटुंब व समाजाच्या आर्थिक-सामाजिक उन्नतीत भर पडत आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ महसुलवाढीपुरता मर्यादित नसून महिलांच्या सबलीकरणाचे प्रतीक ठरला आहे. झोपडपट्टीवासियांना यापूर्वी अपुरे पत्ते, चुकीचा मोबाईल क्रमांक अशा समस्यांमुळे सेवा शुल्क बिल वेळेत मिळण्यामध्ये अडचणी निर्माण होत होत्या. मात्र आता या उपक्रमामुळे सेवा शुल्क बिल वेळेत मिळत असून

# नीटमधून खरोखरच योग्य पारख होते का?



भूमिका

**अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखेत प्रवेश हा गेल्या काही दशकांत पाल्य आणि पालक दोघांसाठीही शिवधनुष्य पेलण्याची परीक्षा घेणारे स्वयंवर होऊन बसले आहे. त्यासाठी अगदी सातवी- आठवीपासून हजारो रुपये फी असलेले ट्युशन क्लासेस, अन् मग कोटा, नारायणा, चैतन्यसारख्या ट्युशन इंडस्ट्रीतील छळवादी पिळवणूक हे नित्याचेच झाले आहे.**

याचे कारण आहे जेईई किंवा नीट सारख्या प्रवेश परीक्षांचे काठिण्य पातळी अधिकाधिक वाढविणारे स्वरूप. जेईई क्रॅक करणे म्हणजे गगनाला गवसणी घालणे! ही एकूणच पद्धत इतकी तांत्रिक, जीवघेणी झाली आहे की त्यापायी अनेक तरुण मानसिक विकृतीचे बळी ठरले आहेत. नैराश्यापोटी आत्महत्या करताहेत. खर्चामुळे अनेक पालकांचे दिवाळे निघत आहे, पण या दुष्परिणामांची कुणालाही चिंता नाही. हे सगळे बदलावे, सुधारावे असे कुणालाही वाटत नाही.मुख्य म्हणजे अशा संस्थांतील प्रवेशासाठी एवढ्या कठीण परीक्षेची मुळात गरज आहे का? या दिव्यातून पार पडलेले अर्जुन, एकलव्य खरेच पुढे काय करतात? आयआयटीच्या नावामुळे त्यांना पटकन नोकरी मिळते, सहज परदेशी जाता येते हे खरे असले तरी खरेच ही मुले शहाणी होतात का? ज्ञान प्राप्त करणे अन् सर्वार्थाने शहाणे (विवेकी) होणे यात फरक आहे. ही मुले मुळात सर्वार्थाने हुशार असती तर





आतापर्यंत आयआयटीच्या एकाही विद्यार्थ्याला वा प्राध्यापकाला नोबेल पुरस्कार का मिळाला नाही, यावरही विचार केला जाणे गरजेचे आहे.आयआयटी परीक्षेची काठिण्य पातळी आणि त्यासाठी लागणाऱ्या तयारीचे स्वरूप लक्षात घेता ती श्रीमंत वर्गाची मक्तेदारी होऊन बसली आहे, हे स्पष्टच आहे. सामान्य घरातील, लहान गावखेड्यांतील मुलांसाठी हे अजूनही हाती न लागणारे दिवास्वप्नच ठरत आहे. विज्ञान गणितात येणारे प्रश्न सोडविता येणारेच तेवढे विद्वान आणि बाकी सगळे सरसकट सामान्य असे हे समीकरण सपशेल चुकीचे आहे. (आयआयटीत अध्ययन अध्यापन दोन्ही केले असल्याने मी हे विधान जबाबदारीने करतो आहे.जर आयआयटीचे दरवाजे सामान्य गावातील गरीब मुलांसह सर्वांसाठी सताड उघडायचे असतील तर या परीक्षेचे स्वरूप आरपार बदलायला हवे. आधी मुलांचा बुद्ध्यांक तपासावा. त्याला तार्किक विचार करता येतो की नाही हे पाहावे. एखाद्या घटनेकडे, प्रश्नाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन त्याच्यापाशी आहे का, हे तपासावे. कुठल्याही कठीण परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी करावी लागणारी विश्लेषण क्षमता ताडून पाहावी. गणितातली सूत्रे, विज्ञानातली उदाहरणे सोडविण्याची बुद्धी क्षमता तपासतानाच, त्याची भावनिक प्रगल्भता (इक्यू) बघावी. कारण बाकी इतर गोष्टी तो/ ती आयआयटीत आल्यावर शिकणारच आहे.महत्वाचे म्हणजे त्याचे व्यक्तिमत्व इंजिनियर किंवा डॉक्टर होण्यायोग्य आहे का हे बघणे जास्त गरजेचे आहे. अन्यथा एखाद्या स्ट्राँग रुमच्या कुलुपासाठी चुकीची किल्ली शोधण्यासारखे होईल. नव्हे सध्या तेच होत आहे.मुळात ज्या संस्थेच्या नावात टेक्नॉलॉजी आहे तिथे व्याख्येप्रमाणे ते तंत्रज्ञान (इंडस्ट्री प्रोसेस, प्रॉडक्टिव्हिटी, डिझाईन) किती शिकवली जाते, हा प्रश्नच आहे. किती आणि इंजिनियरिंग किती, कोणते याचा कुणी शोध घेतला आहे का? विचार केला आहे का? सुशिक्षित पालकदेखील हा विचार करत नाहीत. मग कोवळी अपरिपक्व मुले कसला विचार करणार? कोणतीही गोष्ट गांभीर्याने न घेतल्याचा हा परिणाम आहे. शिक्षण, त्यातही इंजिनियरिंग मेडिकलचे उच्च शिक्षण हा असा हलक्यात घेण्याचा विषय नाही. आपण कोणतीच गोष्ट गांभीर्याने घेत नाही. पाल्य, पालक, शिक्षक, प्राध्यापक, संस्थाचालक, निर्णय घेणारे शासक अधिकारी, सरकारातले निवडून आलेले मंत्री सगळेच शिक्षणाच्या बाबतीत इतके अनभिज्ञ कसे याचे आश्चर्य वाटते.याचे कारण आहे जेईई किंवा नीट सारख्या प्रवेश परीक्षांचे काठिण्य पातळी अधिकाधिक वाढविणारे स्वरूप. जेईई क्रॅक करणे म्हणजे गगनाला गवसणी घालणे! ही एकूणच पद्धत इतकी तांत्रिक, जीवघेणी झाली आहे की त्यापायी अनेक तरुण मानसिक विकृतीचे बळी ठरले आहेत. नैराश्यापोटी आत्महत्या करताहेत. खर्चामुळे अनेक पालकांचे दिवाळे निघत आहे, पण या दुष्परिणामांची कुणालाही चिंता नाही. हे सगळे बदलावे.

## संपादकीय »

# जीएसटीची कक्षा व इंधनदर !

***पेट्रोल व डिझेल यांचा समावेश वस्तू व सेवा करात (जीएसटी) करण्याचे सरकारचे नजीकच्या भविष्यात कोणतेही नियोजन नाही, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले आहे.***

याबाबत राज्यांनी निर्णय घेणे आवश्यक असून राज्यांना तसा प्रस्ताव योग्य वाटल्यास 'जीएसटी' परिषदेच्या बैठकीत त्यावर चर्चा करून निर्णय होईल, हे त्यांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पेट्रोल व डिझेलच्या किमतींच्या बाबतीत कोणतीही पारदर्शकता व विश्वासार्हता नाही. त्यामुळे पेट्रोलजन्य पदार्थांचा समावेश 'जीएसटी'मध्ये करणे देशातील जनतेच्या हिताचे आहे. 'जीएसटी' सुधारणासंबंधीचा मूळ प्रस्ताव हा केंद्र सरकारचा असताना, पेट्रोल व डिझेलसंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकार अथवा भाजपशासित राज्ये 'जीएसटी' परिषदेत का सादर करीत नाहीत? सरकार वसूल करीत असलेले कर व तेल कंपन्याच्या प्रचंड नफ्यामुळे ग्राहकांना पेट्रोल व डिझेलसाठी मूळ दरापेक्षा प्रत्यक्षात फारच जास्त रक्कम मोजावी लागते.

कंत्राटीकरणाच्या सुळसुळाटात राज्य कामगार विभागाने नुकतीच अधिसूचना जारी केली आहे. त्यानुसार, यापुढे सरकारी- निमसरकारी, खासगी, अनुदानित, ट्रस्ट वा सोसायटीद्वारे चालवल्या जाणाऱ्या १० पेक्षा जास्त कर्मचारी असणाऱ्या सर्व कार्यालयांना 'कामगार राज्य विमा योजनेत' (ईएसआयसी) नोंदणी करणे अनिवार्य असणार आहे.

# 'कामगार विम्या'चा उपयोग कुणाला?

एका दृष्टीने हे अतिशय स्तुत्य पाऊल आहे, परंतु यामुळे ईएसआय योजनेची जबाबदारी कैक पटींनी वाढणार आहे.सद्या:स्थितीत भारतात सार्वजनिक, निमसार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांमध्ये गेल्या दोन दशकांत कंत्राटी पद्धत कामगार धोरणाचा महत्त्वाचा भाग झाली आहे. जवळपास सर्वच क्षेत्रांत स्थायी पदांची भरती कमी करून स्वच्छतेपासून उत्पादनापर्यंत बहुतेक सेवांसाठी ठेकेदारांमार्फत कामगार नेमले जातात. कामगार एका आस्थापनेसाठी काम करत असेल तरी त्यांना 'ठेकेदारांकडून काम करण्यासाठी पुरवले गेलेले घटक' अशीच वागणूक दिली जाते. त्यांच्या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याची जबाबदारी कंत्राटदारांवर असते. कंत्राटी कर्मचारी म्हणून किमान वेतन, हक्काच्या रजा, पीएफ, ग्रॅच्युइटी, आरोग्य विमा, मातृत्व लाभ अशा सर्वच अधिकारांसाठी त्यांना कंत्राटदाराच्या नियमांना बांधील राहावे लागते.ठेकेदार हा कामगार आणि व्यवस्थेतील दुवा-मध्यस्थ असतो. कामगाराचा करार थेट



व्यवस्थेशी न झाल्यामुळे तो पूर्णपणे या मध्यस्थावर अवलंबून असतो. कंत्राटी रोजगारांमुळे कामगारांना नोकरीची असुरक्षितता, वेळेवर वेतन न मिळणे, अन्यायकारक वागणूक, सामाजिक व वैद्याकीय सुरक्षेचा अभाव अशा विविध असुरक्षिततांना सामोरे जावे लागते. कागदोपत्री हक्क व त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांत मोठे अंतर आहे! बऱ्याच ठिकाणी कंत्राटी पद्धतीतील कमिशनखोरीमुळे अनेक कामगारांना किमान वेतनसुद्धा मिळत नाही. ठरलेले वेतन एक आणि कंत्राटदाराकडून प्रत्यक्षात मिळणारे वेतन वेगळेच, अशी स्थिती असते आणि याविषयी ब्र काढण्याचीही सोय नसते. काही ठिकाणी कंत्राटी पद्धतीत ठेकेदार किंवा नियुक्त संस्था कामगाराच्या अपघाताची वा आजारपणाची जबाबदारी स्वीकारत नाही. शासनाने 'ईएसआय', 'अटल पेन्शन योजना', 'आयुष्मान भारत' यांसारख्या योजना जाहीर केल्या असल्या, तरीही ठेकेदार प्रणालीतील भ्रष्टाचार, कामगारांच्या असंघटित स्वरूपामुळे योजना कामगारांपर्यंत पोहोचतच नाहीत. कामगारांमध्ये जागरूकतेच्या अभावामुळे याबद्दल कुणीच काही बोलत नाही.७० वर्षांपासून सुरू असलेल्या राज्य कामगार विमा योजनेची महाराष्ट्रात कशी अंमलबजावणी होत आहे, हे पाहण्यासाठी २०२४-२५ मध्ये 'साथी' संस्थेने अभ्यास केला. योजनेतील विविध दवाखाने, रुग्णालये, कार्यालये, योजनेशी निगडित विविध घटक, खासगी कंपन्या आणि कामगार यांचे अनुभव भेटी व मुलाखतींद्वारे जाणून घेतले. याव्यतिरिक्त योजनेचा जमा-खर्च, विमाधारकांची नोंदणी, सेवासुविधा आणि तरतुदींच्या मागील दहा वर्षांतील दस्तऐवजांचा अभ्यास केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

प्रेरणादायक प्रवास

## रोज ४० किमी चालण्याची तयारी ठेवायची

# चारशे रुपये महिन्यात संसार करायचा!

## कोणत्या अटींवर झाले होते लग्न?




| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक विधिमंडळाच्या अधिवेशनात पाशवी बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आले आहे. हे विधेयक घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक असून जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे असून ते रद्द करण्यात यावे, अशी आक्रमकपणे मागणी करत महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी बुधवारी साताऱ्यातील पोवई नाक्यावर तीव्र आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी या कायद्याच्या प्रतीची होळीदेखील केली.**

राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना (उध्दव ठाकरे), भाकप, माकप, माकप (मा.ले.), समाजवादी पक्ष, स.क.प, भारिप, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल, जनआंदोलन संघर्ष समिती आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती या पक्ष संघटनांनी एकत्रित येत हे आंदोलन केले. काँग्रेस कमिटी येथे सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्रित जमले. तिथून पोवईनाक्यावरील शिवतीर्थापर्यंत मोर्चा काढला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून जनसुरक्षा विधेयकाचा जाहीर निषेध, महायुतीचे सरकार लोकशाहीला घाबरते, जनसुरक्षा विधेयक सत्ता शाबूत ठेवण्यासाठीच अशा निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या.श्रमिक मुक्ती दलाचे संस्थापक डॉ. भारत पाटणकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, राजकुमार पाटील, बाबुराव शिंदे, दिलीप बाबर, गोरखनाथ नलावडे, साहिल शिंदे, राजेंद्र शेलार आदींच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले.यावेळी डॉ. भारत पाटणकर म्हणाले, हे विधेयक मंजूर करण्यापूर्वी विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. या विधेयकाला प्रत्यक्ष व दिलेल्या संकेतस्थळावर सूचना व विरोध नोंदवण्यात आला आहे. राज्यभरातून तेरा हजार हरकती दाखल करण्यात आल्या. त्यापैकी साडेनऊ हजार हरकती हे विधेयक रद्द करावे, अशा मागण्यांसाठी आहेत.जुलमी सरकार सांविधानिक मार्गांनी सरकारला जाब विचारणारांना दडपून टाकू पाहत आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक, पत्रकार, यू ट्युबर्स, जाणते नागरिक यांनी भाजप व महायुती विरोधात व संविधान रक्षणासाठी जी ठाम भूमिका घेतली व महाविकास आघाडीला पाठिंबा दिला, त्या सर्वांना धडा शिकविण्यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे. आता या कायद्याच्या विरोधात सामान्य, निडर नागरिकच उतरतील म्हणून या कायद्याच्या विरोधात राज्यभर आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. यावेळी बाबुराव शिंदे यांचे भाषण झाले.बाबुराव शिंदे म्हणाले, की या विधेयकामध्ये नमूद केलेले बेकायदेशीर कृत्य म्हणजे जमावबंदीचा हुकूम मोडून शांततामय मोर्चा काढण्यापासून ते एखाद्या सरकारी कार्यालयाबाहेर उपोषणाचे, धरणे वा सत्याग्रहाचे शांततामय आंदोलनदेखील समाविष्ट होऊ शकेल. सरकारी यंत्रणेवरील टीका, सरकारी धोरणांवरील टीका, मंत्री, अधिकारी यांच्यावरील टीकाटिप्पणी ही देखील बेकायदेशी कृत्य ठरवले जाईल. विधेयक पटलावर ठेवताना मुख्यमंत्र्यांनी जी मांडणी केली, त्यातून हे उघड झाले आहे की राजकीय पक्षातील नेत्यांना ईडी, सीबीआयची तलवार टांगून दबावाखाली ठेवता येते. एमएमआरडीए, नैना, बल्क ड्रग्ज फार्मा पार्क, दिल्ली-मुंबई कॉरिडोर, जे. एस. डब्ल्यू यांसारख्या प्रकल्पांना विरोध करणे हेही बेकायदशीर कृत्य ठरू शकते. जनसुरक्षा विधेयक नसून फक्त सरकारमध्ये स्वत:च्या सत्तेच्या सुरक्षेसाठी आणलेले विधेयक असून त्याला विरोध करायलाच हवाले.), समाजवादी पक्ष, स.क.प, भारिप, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल, जनआंदोलन संघर्ष समिती आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती या पक्ष संघटनांनी एकत्रित येत हे आंदोलन केले.

### दाम्पत्याचा प्रेरणादायक प्रवास

काँग्रेस कमिटी येथे सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्रित जमले. तिथून पोवईनाक्यावरील शिवतीर्थापर्यंत मोर्चा काढला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून जनसुरक्षा विधेयकाचा जाहीर निषेध, श्रमिक मुक्ती दलाचे संस्थापक डॉ. भारत पाटणकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, राजकुमार पाटील, बाबुराव शिंदे, दिलीप बाबर, गोरखनाथ नलावडे, साहिल शिंदे, राजेंद्र शेलार आदींच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले.

# लॉन्चर उतरवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू

## करडजवळील ढेबेवाडी फाट्यावरील वाहतुकीत बदल



| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे – बंगळुरू महामार्गाच्या सहापदरीकरणातील कराड ते नांदलापूर दरम्यानच्या नव्या नव्या उड्डाणपुलाच्या कामासाठी वापरण्यात आलेले लॉन्चर मशीन उतरवण्याचेकाम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. मोठी तयारी करुन दोन लॉन्चर मशीन निर्विघ्नपणे उतरवण्यातही आल्या आहेत.**

कराडजवळील ढेबेवाडी फाट्यावर ठेकेदार कंपनीने ही भलीमोठी लॉन्चर मशीन उतरवण्याची यंत्रणा उभी केली असून, या लॉन्चर मशीन उतरण्यासाठी लागणारी जम्बो क्रेन ढेबेवाडी फाट्यावरती दाखल होवून कार्यरतही झाली आहे. लॉन्चर उतरवण्यासाठी आठ ते पंधरा दिवस लागणार आहेत. त्यामुळे येथील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. सध्याच्या वाहतूक व्यवस्थेमुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार असल्याने नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन ठेकेदार अदानी व पोटठेकेदार डी पी जैन कंपनीसह पोलीस व प्रशासकीय यंत्रणेनेही केले आहे.लॉन्चर उतरवण्याचे काम आठ ते पंधरा दिवस चालणार आहे. त्यासाठी कराडजवळील आणि मलकापूर शहरातील ढेबेवाडी फाटा येथील जागा निश्चित झाली आहे. हा परिसर अतिशय वर्दळीचा असल्याने प्रशासनाकडून आधी काय स्थिती होईल याची चाचणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या ठिकाणची चाचणी महिन्यापूर्वी पुर्ण झाली होती.

आता प्रत्यक्ष लॉन्चर मशीन उतरवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे येथील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

### उड्डाणपुलाखालील मार्गाचा वापर करावा

सेवा रस्त्यावरील वाहतूक उड्डाणपुलाखालून वळवण्यात आली आहे. विंग- चचेगाव- ढेबेवाडीकडून येणाऱ्या वाहनांनी पर्यायी म्हणजेच उड्डाणपुलाखालील मार्गाचा वापर करावा. तर, कराड शहरातून कोल्हापूरकडे जाणाऱ्या वाहनांनी कराड बैलबाजार मार्गे शिंदे मळा ते महामार्ग अशा रस्त्याचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शशी थरूर यांचा इशारा

## भारतावर लादलेल्या टॅरिफवरून शशी थरूर यांचा इशारा

# फरक पडत नाही, अशा भ्रमात राहू नका

### ५० टक्क्याच्या टॅरिफचा फटका

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि भारताच्या संबंधांमध्ये टॅरिफच्या मुद्द्यावरून चांगलाच तणाव निर्माण झाला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादलं आहे. भारत रशियाकडून खजिन तेल खरेदी करत असल्याचं कारण सांगत ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादलं. एवढंच नाही तर ट्रम्प यांनी भारताला अनेकदा डिवचण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारताने ट्रम्प यांच्या दबावाला जुमानलं नाही.**



अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्क्याच्या टॅरिफचा फटका भारताला येणाऱ्या काळात बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या अमेरिका-भारत संबंधांबाबत ट्रम्प यांचा सूर बदलल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. पण असं असलं तरी अद्याप अमेरिका आणि भारतात व्यापार करार झालेला नाही. दरम्यान, या सर्व घडामोडींवर आता काँग्रेसचे नेते आणि खासदार शशी थरूर यांनी भाष्य करत सूचक इशारा दिला आहे. 'काही फरक पडत नाही, अशा खोट्या भ्रमात राहू नका', असं शशी थरूर यांनी म्हटलं आहे.अमेरिकेने लादलेल्या अतिरिक्त शुल्कामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसत आहे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार गमावले जाऊ शकतात", असं म्हणत शशी थरूर यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर घणाघात केला. ते सिंगापूरमधील एका कार्यक्रमात बोलत होते.शशी थरूर म्हणाले की, "रशियन तेल खरेदी केल्याच्या कारणास्तव ५० टक्के शुल्क लादण्याच्या अमेरिकेच्या निर्णयामुळे अनेक भारतीय निर्यातदार अमेरिकन बाजारपेठेत व्यवहार करू शकणार नाहीत. आधीच अनेक लोक नोकऱ्या गमावत आहेत. सुरतमध्ये हिरे आणि दागिन्यांच्या व्यवसायात १.३५ लाख लोकांना कामावरून काढून टाकण्यात आलं आहे. फूड आणि उत्पादन क्षेत्रांनाही मोठं नुकसान सहन करावं लागत आहे. अमेरिकेच्या अतिरिक्त शुल्कामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला फटका बसत आहे. त्यामुळे आपण काही फरक पडत नाही, अशा खोट्या भ्रमात राहू नये."भारताला हा फटका सहन करण्यासाठी निर्यातीच्या बाजारपेठेत विविधता आणण्याची आवश्यकता आहे. अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश करणं खूप कठीण होऊ शकतं. अतिरिक्त २५ टक्के कर हे शुल्क नाही तर ते एकप्रकारे निर्बंध आहेत आणि ते पूर्णपणे अन्यायकारक आहेत. कारण चीन देखील रशियाकडून तेल आणि वायू आयात करत आहे", असं म्हणत शशी थरूर यांनी अमेरिकेला सर्व देशांसाठी एकसमान धोरण स्वीकारण्याचं आवाहन केलं. शशी थरूर पुढे म्हणाले की, "अतिरिक्त शुल्काचा भारतावर नकारात्मक परिणाम झाला आहे. मात्र, आता भारताकडे कंबर कसून पुढे जाण्याशिवाय पर्याय नाही. तसेच भारताने युरोप, चीन आणि रशियाशी मजबूत संबंध केले पाहिजेत. भारताची जागतिक पातळी वाढविण्यासाठी भारताने त्याच्या बाजारपेठा आणि राजनैतिक मार्गांमध्ये विविधता आणली पाहिजे. आम्हाला तिथे बसून असं म्हणता येणार नाही की आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नाही."अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्क्याच्या टॅरिफचा फटका भारताला येणाऱ्या काळात बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या अमेरिका-भारत संबंधांबाबत ट्रम्प यांचा सूर बदलल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. पण असं असलं तरी अद्याप अमेरिका आणि भारतात व्यापार करार झालेला नाही. दरम्यान, या सर्व घडामोडींवर आता काँग्रेसचे नेते आणि खासदार शशी थरूर यांनी भाष्य करत सूचक इशारा दिला आहे.डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर घणाघात केला. ते सिंगापूरमधील एका कार्यक्रमात बोलत होते.शशी थरूर म्हणाले की, "रशियन तेल खरेदी केल्याच्या कारणास्तव ५० टक्के शुल्क लादण्याच्या अमेरिकेच्या निर्णयामुळे अनेक भारतीय निर्यातदार अमेरिकन बाजारपेठेत व्यवहार करू शकणार नाहीत. आधीच अनेक लोक नोकऱ्या गमावत आहेत. सुरतमध्ये हिरे आणि दागिन्यांच्या व्यवसायात १.३५ लाख लोकांना कामावरून काढून टाकण्यात आलं आहे.

### अतिरिक्त २५ टक्के कर हे शुल्क नाही

फूड आणि उत्पादन क्षेत्रांनाही मोठं नुकसान सहन करावं लागत आहे. अमेरिकेच्या अतिरिक्त शुल्कामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला फटका बसत आहे. त्यामुळे आपण काही फरक पडत नाही, अशा खोट्या भ्रमात राहू नये."भारताला हा फटका सहन करण्यासाठी निर्यातीच्या बाजारपेठेत विविधता आणण्याची आवश्यकता आहे. अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश करणं खूप कठीण होऊ शकतं. अतिरिक्त २५ टक्के कर हे शुल्क नाही.

## भारत-अमेरिका संबंधांमध्ये दरी का निर्माण झाली?

## अमेरिकेच्या माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराचं विधान चर्चेत

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**डोनाल्ड ट्रम्प यांनी जगातील अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादलं आहे. भारताने रशियाकडून खजिन तेल खरेदी केल्याचा मुद्दा उपस्थित करत ट्रम्प यांनी भारतावरही तब्बल ५० टक्के टॅरिफ लादलं. एवढंच नाही तर टॅरिफच्या मुद्यांवरून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला अनेकदा डिवचण्याचा प्रयत्नही केला. मात्र, भारताने ट्रम्प यांच्या दबावाला जुमानलं नाही.**



दरम्यान, मागच्या काही दिवसांत ट्रम्प यांचा सूर बदलल्याचं दिसून येत आहे. मात्र, असं असतानाच अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांनी एक मोठा दावा केला आहे. जॉन बोल्टन यांनी म्हटलं की, "ट्रम्प आणि मोदी यांच्यात दरी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. व्हाईट हाऊसचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी एकदा पंतप्रधान मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात भांडण लावण्याचा प्रयत्न केला होता", असं विधान जॉन बोल्टन यांनी केलं. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.जॉन बोल्टन यांनी म्हटलं की, "दोन्ही देशांमधील व्यापारावर चर्चा करण्यासाठी जे खऱ्या पद्धतीने वाटाघाटी करणारे एकत्र बसत नाहीत, तोपर्यंत ही एक ढोंगी गोष्ट आहे असं मला वाटतं. जी सुरक्षितपणे दुर्लक्षित केली जाऊ शकते. भारत सोशल मीडियावरील धमक्या आणि आवाजाशिवाय कठोर परिश्रम करू शकतो. मी असं म्हणत नाही की हे प्रश्न सहज किंवा लवकर सोडवले जातील. पण मला वाटतं की दोन्ही बाजूंनी सहकार्याची भूमिका असेल तर यावर काम करण्याचा प्रयत्न करू शकतो."

### हॉवर्ड लुटनिक यांचं मोठं विधान

अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा भाष्य करत अमेरिका भारताशी व्यापार करार करणार की नाही? याविषयी स्पष्ट भूमिका मांडली आहे. हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा संकेत दिले की भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवल्यानंतरच भारताबरोबर अमेरिका व्यापार कराराच्या संदर्भाने पुढे जाऊ शकते.

# हृतिक-दीपिकाचा 'फायटर' लवकरच पार करणार १०० कोटींचा टप्पा

हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण यांच्या 'फायटर' या चित्रपटाला चाहते, समीक्षक आणि प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सिद्धार्थ आनंदच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवरही जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी २२.५ कोटी रुपयांची कमाई या चित्रपटाने केली आहे. चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये हळूहळू वाढ होत आहे. 'फायटर' या चित्रपटाने शनिवारी २८ कोटींहून अधिक कमाई केल्याचं स्पष्ट झालं आहे.इंडस्ट्री ट्रॅकर 'सॅकनिक'च्या रिपोर्टच्या सुरुवातीच्या अंदाजानुसार 'फायटर'ने तिसऱ्या दिवशी २७.५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाने शुक्रवारी २६ जानेवारीला ३९.५ कोटींची कमाई केली होती. यासह, या चित्रपटाचे एकूण कलेक्शन आता ८९.५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे त्यामुळे लवकरच हा चित्रपट १०० कोटींचा टप्पा पार करेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. 'फायटर'च्या सकाळच्या शोलादेखील चांगली गर्दी होताना पाहायला मिळत आहे. तर संध्याकाळ



व रात्रीचे शो हे जबरदस्त गर्दीत हाऊसफूल होत आहेत. इतकंच नव्हे तर समीक्षकांनीही या चित्रपटाला चांगला प्रतिसाद दिला असून येत्या रविवारी या कमाईच्या आकड्यात आणखी वाढ होणार याची शक्यता आहे. 'पठाण' आणि 'वॉर' फेम सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित हा चित्रपट भारतीय वायु सेनेच्या शौर्य, बलिदान आणि देशभक्तीला श्रद्धांजली म्हणून सादर करण्यात आला आहे.गुरुवार २५ जानेवारी रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. 'फायटर'मध्ये हृतिक रोशन, दीपिका पदुकोण, अनिल कपूर यांच्यासह अक्षय ओबेरॉय, करण सिंग ग्रोव्हर आणि संजीदा शेख यांच्याही भूमिका आहेत. या चित्रपटात हृतिक रोशन व दीपिका पदूकोण ही जोडी प्रथमच पडद्यावर दिसली अन् प्रेक्षकांना ती पसंतही पडली. तसेच चित्रपटातील काही बोल्ड सीन्सवर सेन्सॉरने कात्री चालवल्याने हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला होता.

हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण यांच्या 'फायटर' या चित्रपटाला चाहते, समीक्षक आणि प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सिद्धार्थ आनंदच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवरही जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी २२.५ कोटी रुपयांची कमाई या चित्रपटाने केली आहे. चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये हळूहळू वाढ होत आहे. 'फायटर' या चित्रपटाने शनिवारी २८ कोटींहून अधिक कमाई केल्याचं स्पष्ट झालं आहे.

## दारूच्या बाटलीवरुन नोकराला मारहाण

पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामुळे सगळेच हैराण झाले आहेत. चाहत्यांनाही हा व्हिडीओ पाहून मोठा धक्का बसला आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये राहत फतेह अली खान आपल्याच नोकराला मारहाण करताना दिसत आहेत. ही मारहाण करताना टेबलावर ठेवलेली दारूची बाटली गेली कुठे, अशी विचारणाही ते करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोकांनी राहत फतेह अली खान यांच्यावर बरीच टीका केली आहे. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर राहत यांना चांगलेच खडेबोल सूनवायला सुरुवात केली. हे पाहताच राहत यांनी एक व्हिडीओ शेअर करत घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. व्हिडीओमध्ये राहत आपल्या घरातील काम करणाऱ्या नोकराला चपलेने मारताना अन् खेचतान दिसत आहेत.

## यामीच्या घरी गुडन्यूज?

बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमसध्या तिच्या आर्टिकल 370 या सिनेमामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच आर्टिकल 370 या सिनेमातील तिचा फर्स्ट लूक पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. याशिवाय टिझर आणि सिनेमाच्या रिलीज डेटबाबतही घोषणा करण्यात आली आहे. सिनेमाची घोषणा करण्यात आल्यानंतर अभिनेत्री यामी गौतमने पती आणि आई समवेत दिसली होती. दरम्यान आता यामीचा लूक पाहिल्यानंतर ती प्रेग्नंट असल्याच्या बातम्या व्हायरल होत आहेत. मात्र, या प्रेग्नंसीबाबत्या बातम्यांना यामीकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आलेले नाही. यामी गौतम आणि आदित्य धर मुंबईत एकत्रित स्पॉट झाली. यावेळी यामीने गुलाबी कलरचा सूट घातलेला दिसतोय. तर दिग्दर्शक आदित्य धर पांढऱ्या रंगाच्या कुर्त्यामध्ये यामीसोबत दिसत आहेत. दोघे एकत्रित दिसले आणि यामीच्या वेगळ्याच लूकने चाहत्यांचे लक्ष वेधलं आहे. यामी गौतम प्रेग्नंट असल्याच्या बातम्यांनी जोर धरलाय. दरम्यान यामीने गुलाबी सूटच्या ओढणीला वेगळ्या अंदाजात कॅरी करताना पाहिले. त्यामुळे सोशल मीडियावर चाहते यामी प्रेग्नंट असल्याची शक्यता वर्तवताना दिसत आहेत.



## प्रियांका चोप्राच्या पतीचं भारतात जोरदार स्वागत!

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांकाचा पती निक जोनास हा अमेरिकेतील प्रसिद्ध गायक आहे. निकचे मोठे भाऊ केविन आणि जो यांच्यासह 'जोनास ब्रदर्स' नावाचा त्यांचा बँड आहे, जो जगभरात प्रसिद्ध आहे. निक जोनास व त्याचे भाऊ केविन जोनास आणि जो जोनास हे भारतात आले आहेत. मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर शनिवारी त्यांचा भव्य संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा त्यांचा भारतातील पहिला संगीत कार्यक्रम होता. भारतात निक आणि जोनास ब्रदर्सचे प्रचंड चाहते आहेत. निक गाण्यासाठी स्टेजवर येताच जमलेल्या प्रेक्षकांनी 'जीजू' असे संबोधित निकचे स्वागत केले. किंग आणि निकच्या "तू मान मेरी जान" या कोलॅबरेटेड गाण्यावर प्रेक्षक मंत्रमुग्ध होताना दिसले.जोनास ब्रदर्सचा भारतात पहिलाच कार्यक्रम असल्याने चाहते अतिउत्साही दिसत होते. शनिवारच्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसत आहेत. यात जोनास ब्रदर्स त्यांच्या कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेताना दिसले.यातला मजेशीर भाग म्हणजे, जो आणि केविनने चाहत्यांना निकची ओळख 'जीजू' म्हणून करून दिली, त्यामुळे तिथे जमलेल्या प्रेक्षकांनी निकचा 'जीजू' 'जीजू' असा जयघोष करत स्वागत केले. २०२३ ला रीलिज झालेल्या ""तू मान मेरी जान' X 'आफ्टरलाईफ"" या गाण्यावर निक आणि किंगने एकत्र संगीत सादर केलं. कॉन्सर्टदरम्यान निक मजेशीररित्या प्रेक्षकांना म्हणाला, "भारतात परफॉर्म करण्याची आमची ही पहिलीच वेळ आहे. यात २०१८ मध्ये झालेल्या प्री वेडिंगमधला संगीत सोहळा ग्राह्य धरला जात नाही."भारतासाठी असलेल्या आपल्या भावना व्यक्त करत निक प्रेक्षकांना म्हणाला, "एक कुटुंब म्हणून आपलं या देशाशी घट्ट नातं आहे. तुमच्या या उत्साहपूर्ण स्वागतासाठी धन्यवाद. या संगीत कार्यक्रमासाठी तुमची उपस्थिती दर्शवल्याबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे. या कॉन्सर्टची ही रात्र नक्कीच रोमांचक असेल, याचं मी आश्वासन देतो."

## आयशा खानने सांगितली धक्कादायक घटना

'बिग बॉस 17' या कार्यक्रमाचा ग्रँड फिनाले आज पार पडणार आहे. बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एंट्री करणारी आयशा खान ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. आयशाचा एक एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती तिच्या बालपणाशी संबंधित एक धक्कादायक घटना सांगताना दिसत आहे. आयशानं एका मुलाखतीमध्ये सांगितलं की, ती 9 वर्षांची असताना एका व्यक्तीनं तिच्यासोबत वाईट कृत्य केलं होतं.आयशा खानने अलीकडेच सिद्धार्थ कन्नन्च्या मुलाखतीत तिच्यासोबत बालपणी घडलेल्या घटनेबद्दल सांगितलं. तिनं मुलाखतीमध्ये सांगितलं, "एक काका आले आणि त्यांनी मला बोलावले. मी विचारले, काय हवंय काका? त्यांनी मला एक पत्ता विचारला. मग त्यांना मी तो पत्ता सांगितला. मग त्यांनी विचारले की, मी तिथे तुला घेऊन जाऊ शकतो का? मी त्यांना होकार दिला."पुढे आयशा म्हणाली, "ते काका आणि मी एका इमारतीत गेलो. तिथून खाली येत असताना त्यांनी अचानक मला पायऱ्यांवर ढकलले. यानंतर ते माझ्यावर जबरदस्ती करू लागले. त्या क्षणी मला समजत नव्हते की, काय होत आहे. पण काहीतरी चुकीचं घडतंय हे माझ्या लक्षात येत होतं. पण नक्की काय होतंय? ते मी समजू शकले नाही. 9 वर्षाच्या मुलीला हे सर्व समजू शकत नाही. मला ओरडता येत नव्हते. त्यांनी माझ्या तोंडावर हात ठेवला. मीओरडण्याचा प्रयत्न करत होते मी त्यांना म्हणत होते, माझी आई तिथेच उभी आहे. प्लीज काका मला जाऊ द्या." यशानं पुढे मुलाखतीत सांगितलं.



**अकमलने दिलं स्पष्टीकरण**

## २०१० मध्ये झालेल्या वादावर अकमलने दिलं स्पष्टीकरण

# गौतम गंभीर खूप चांगला आहे!

## गंभीरविरूद्ध झालेल्या वादावर स्पष्टीकरण



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. येत्या रविवारी (१४ सप्टेंबर) भारतीय संघाचा सामना पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. यावेळी या स्पर्धेचे आयोजन दुबईत करण्यात आले आहे. हा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रंगणार आहे. एप्रिल महिन्यात पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत- पाकिस्तान दोन्ही संघ पहिल्यांदाच आमनेसामने येणार आहेत. त्यामुळे या सामन्याला कडाडून विरोधही केला गेला. पण भारत सरकारने दिलेल्या होकारामुळे हा सामना होणार आहे. दरम्यान पाकिस्तानचा माजी खेळाडू कामरान अकमलने या सामन्याबद्दल आपली प्रतिक्रिया दिली आहे.**

कामरान अकमलने दोन्ही देशातील क्रिकेट चाहत्यांना विनंती केली आहे, की केवळ सामन्याचा आनंद घ्या. यादरम्यान त्याने २०१० मध्ये भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरसोबत झालेल्या वादावर देखील मोठा खुलासा केला आहे.आशिया चषक २०१० स्पर्धेचे आयोजन श्रीलंकेत केले गेले होते. या स्पर्धेत झालेल्या भारत- पाकिस्तान सामन्यादरम्यान गौतम गंभीर आणि कामरान अकमल यांच्यात झालेल्या वादाची तुफान चर्चा रंगली होती. आता १५ वर्षांनंतर कामरान अकमलने या वादावर स्पष्टीकरण दिलं आहे. अकमलच्या मते, जे काही झालं ते गैरसमज झाल्यामुळे झालं होतं. गंभीरसोबत झालेल्या वादावर स्पष्टीकरण देताना कामरान अकमल म्हणाला," जे काही झालं ते गैरसमज झाल्यामुळे झालं होतं. गौतम गंभीर खूप चांगला आहे. आम्ही अ गटाकडून खेळण्यासाठी केनियाला एकत्र गेलो होतो. तेव्हापासून आम्ही खूप चांगले मित्र बनलो आहोत."मैदानावरील घटनाक्रम सांगताना कामरान अकमल म्हणाला, "त्या सामन्यात (आशिया चषक २०१०) त्याने फटका खेळण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा फटका फसला आणि मी जोरदार अपील केली. त्यावेळी तो चुकीचा शॉट मारल्यामुळे स्वत:ची समजूत काढत होता. पण मला वाटलं तो मला काहीतरी म्हणाला. त्यामुळे आमच्यात गैरसमज झाला."तसेच भारत- पाकिस्तान सामन्याबद्दल बोलताना त्याने म्हटलं की, " मला अशी आशा आहे की, भारत- पाकिस्तान सामन्यावेळी स्टेडियम पूर्ण भरलेलं असेल. क्रिकेटमुळे दोन्ही देशातील राजनैतिक तणाव दूर होऊ शकतो. त्यामुळे क्रिकेट होणं खूप गरजेचं आहे." भारत सरकारनेही या सामन्यासाठी परवानगी दिली आहे. दोन्ही देश द्विपक्षीय मालिका वगळता इतर स्पर्धांमध्ये एकमेकांविरूद्ध खेळू शकतात.कामरान अकमलने दोन्ही देशातील क्रिकेट चाहत्यांना विनंती केली आहे, की केवळ सामन्याचा आनंद घ्या. यादरम्यान त्याने २०१० मध्ये भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरसोबत झालेल्या वादावर देखील मोठा खुलासा केला आहे.आशिया चषक २०१० स्पर्धेचे आयोजन श्रीलंकेत केले गेले होते. या स्पर्धेत झालेल्या भारत- पाकिस्तान सामन्यादरम्यान गौतम गंभीर आणि कामरान अकमल यांच्यात झालेल्या वादाची तुफान चर्चा रंगली होती. आता १५ वर्षांनंतर कामरान अकमलने या वादावर स्पष्टीकरण दिलं आहे. अकमलच्या मते, जे काही झालं ते गैरसमज झाल्यामुळे झालं होतं. गंभीरसोबत झालेल्या वादावर स्पष्टीकरण देताना कामरान अकमल म्हणाला," जे काही झालं ते गैरसमज झाल्यामुळे झालं होतं. गौतम गंभीर खूप चांगला आहे. आम्ही अ गटाकडून खेळण्यासाठी केनियाला एकत्र गेलो होतो. तेव्हापासून आम्ही खूप चांगले मित्र बनलो आहोत."मैदानावरील घटनाक्रम सांगताना कामरान अकमल म्हणाला, "त्या सामन्यात (आशिया चषक २०१०) त्याने फटका खेळण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा फटका फसला आणि मी जोरदार अपील केली. त्यावेळी तो चुकीचा शॉट मारल्यामुळे स्वत:ची समजूत काढत होता. पण मला वाटलं तो मला काहीतरी म्हणाला. त्यामुळे आमच्यात गैरसमज झाला."तसेच भारत- पाकिस्तान सामन्याबद्दल बोलताना त्याने म्हटलं.

### स्पर्धांमध्ये एकमेकांविरूद्ध खेळू शकतात

मला अशी आशा आहे की, भारत- पाकिस्तान सामन्यावेळी स्टेडियम पूर्ण भरलेलं असेल. क्रिकेटमुळे दोन्ही देशातील राजनैतिक तणाव दूर होऊ शकतो. त्यामुळे क्रिकेट होणं खूप गरजेचं आहे." भारत सरकारनेही या सामन्यासाठी परवानगी दिली आहे. दोन्ही देश द्विपक्षीय मालिका वगळता इतर स्पर्धांमध्ये एकमेकांविरूद्ध खेळू शकतात.

# अशी क्रीडा संस्कृती पाकिस्तानमध्ये नाही

## Pakistanच्या माजी खेळाडूकडून भारतीय क्रिकेटचं कौतुक



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये सध्या तणावाची स्थिती आहे. एप्रिल महिन्यात झालेल्या पहलगाम हल्ल्यामुळे दोन्ही देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पहलगाम येथे पर्यटनासाठी आलेल्या निष्पाप भारतीयांचा जीव घेतला होता. त्यानंतर प्रत्युत्तर देण्यासाठी भारताकडून ऑपरेशन सिंदुर राबवण्यात आलं होतं.**

हे सर्व पाहता, आशिया चषकातील भारत- पाकिस्तान सामना रद्द होणार की काय, अशी चिन्हे होती. पण भारत सरकारने होकार दिल्यामुळे हा सामना १४ सप्टेंबरला दुबईत खेळवला जाणार आहे. या सामन्याआधी पाकिस्तानच्या माजी वेगवान गोलंदाजाने भारतीय क्रिकेटमधील रणनीती आणि खेळाडूंच्या व्यवस्थापनाचं तोंडभरून कौतुक केलं आहे. उमर गुल हा पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज आहे. त्याने भारतीय क्रीडा संस्कृतीचं कौतुक केलं आहे. गुल म्हणाला, "भारतात खेळाडूंच्या कार्यभार आणि दुखापतींचे व्यवस्थापन अत्यंत बारकाईने केले जाते. जेव्हा एखाद्या गोलंदाजाला दुखापत होते. त्यावेळी त्याच्या गोलंदाजीच्या गतीत घसरण होऊ शकते. पण बुमराहने हे दाखवून दिलं की, योग्य रिहॅब आणि विश्रांती घेतल्यामुळे गोलंदाजीची गती आणि कामगिरी दिर्घकाळ टिकवून ठेवता येऊ शकते."गुलने भारतीय क्रिकेटची तुलना पाकिस्तान क्रिकेटशी केली आहे. गुल म्हणाला,"जेव्हा आम्ही खेळायचो, तेव्हा कोणताही वरिष्ठ खेळाडू माघार घ्यायला तयार नसायचा. ७०-८० टक्के फिट असलेला खेळाडूही खेळण्यासाठी पूर्ण प्रयत्न करायचा.

### वरिष्ठ खेळाडू खेळत राहतात

गुलच्या मते, पाकिस्तानमध्ये केवळ खेळाडूंच्या कामगिरीकडे पाहिलं जातं. एखादा नवखा खेळाडू चांगला खेळत असेल, तर त्याला संधी मिळते. पण संघातील अनुभवी खेळाडूंच्या फिटनेसकडे लक्ष दिलं जात नाही. त्यामुळे दुखापतग्रस्त होऊनही अनेक वरिष्ठ खेळाडू खेळत राहतात. याचा परिणाम त्यांच्या कामगिरीवर होतो.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 13 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

DYP Dr. D. Y. PATIL COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT, AKURDI, PUNE

**Institute Code: 18197**

# TRAINING & PLACEMENT CELL ORGANIZED



**STUDENTS INTERACTION SESSION UNDER**

Industry and Academic Integration for
Industry's Demands & High Employability

**IN COLLABORATION WITH**

**KHET PE - SWAN ENERGY LTD.**



**Date: 3rd Sep 2025**
**Time: 11.00am to 12.30pm**
**Venue: MCA Seminar Hall**

www.dypagribusiness.ac.in | info.dypagribusiness.ac.in | @dypabmakaurdi | @dypcabm | @dypabm

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
। दि. 13 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# धावडेवस्ती- भगतवस्तीमध्ये भाजपा ‘राजेंद्र’ ठरणार की; विरोधकांचा ‘रवि’ तळपणार!

## ग्राऊंड रिपोर्ट: प्रभाग क्रमांक 6 मध्ये गावकी-भावकी अन् प्रतिष्ठेची लढाई!

। पिंपरी चिंचवड । अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष स्वबळावर लढवतील, असे चित्र आहे. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने “महाईन्यूज” च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला “ग्राऊंड रिपोर्ट” प्रसिद्ध करीत आहोत.**





“ भोसरी रुग्णालयाचे खासगीकरण आम्ही थांबवले. कोविड काळात हजारो नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे. बहुउद्देशीय सभागृह आणि रुग्णालयाचे आरक्षण विकसित झाले. प्रभागातील नागरिकांच्या संपर्कात आहोत. सर्वच पक्ष स्वबळावर लढण्याच्या मानसिकतेमध्ये आहेत. त्यामुळे विकासकामांच्या जोरावर आम्ही निवडणूक निश्चितपणे जिंकणार आहोत.

.–**रवि लांडगे,** माजी नगरसेवक.




“ गेल्या 8 वर्षांमध्ये आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. लोकांसोबत आमचे एक विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. रेड झोन आणि प्राधिकरण हद्दीत विखुरलेल्या प्रभागात आम्ही पायाभूत सोयी-सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला लोकांची साथ मिळेल आणि आमचे चारही नगरसेवक निवडून येतील.

.– **राजेंद्र लांडगे,** भाजपा.

2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग “रचना जैसे थे” आहे. प्रभाग क्रमांक 6 मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 53 हजार 120 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 4 हजार 700 इतकी अनुसूचित जाती आणि 1 हजार 800 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये शहरात भाजपाची मोठी लाट होती. या प्रभागातून भाजपाचे चारही नगरसेवक निवडून आले होते. प्रभागातील अ- गटातून भाजपाच्या यशोदा बोईनवाड यांनी 12 हजार 628 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या आशा सुपे यांचा पराभव केला होता. ब- गटातून भाजपाच्या तिकीटावर लढलेल्या सारिका लांडगे यांनी 9 हजार 240 मते मिळवली होती. त्यांनी राष्ट्रवादीच्या सुनिता गवळी आणि शिवसेनेच्या करिष्मा बढे यांचा पराभव केला होता.




विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या त्यावेळी समर्थक असलेल्या सारिका लांडगे यांनी विधानसभा निवडणूक 2024 पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर विधानसभा निवडणूक 2024 मध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटात आणि त्यानंतर आता त्या राष्ट्रवादी अजित पवार गटात आहेत.

क- गटातून तत्कालीन भाजपाचे रवि लांडगे या प्रभागातून बिनविरोध निवडून आले होते. त्यावेळी राष्ट्रीय खेळाडू योगेश लांडगे यांनी माघार घेतली आणि रवि यांचा बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला. मात्र, आमदार महेश लांडगे यांचे समर्थक असलेले रवि लांडगे यांनी स्थायी समिती सभापती संधी न दिल्यामुळे नंतरच्या काळात महेश लांडगेंच्या विरोधात भूमिका घेतली. भाजपा सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला.

महाविकास आघाडीच्या माध्यमातून विधानसभा निवडणूक 2024 मध्ये जोरदार तयारी केली. निवडणुकीपूर्वी त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. मात्र, महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये त्यांना संधी मिळाली नाही. विधानसभा निवडणुकीत त्यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटातून निवडणूक लढवलेले अजित गव्हाणे यांच्यासाठी रवि लांडगे यांनी प्रचार केला. मात्र, या निवडणुकीत महेश लांडगे यांनी बाजी मारली. रवि लांडगे आणि अजित गव्हाणे यांची एकत्र ताकद केली असतानाही, या प्रभागातून महेश लांडगे यांना सुमारे 7 हजार 500 हून मताधिक्य मिळाले.

प्रभागातील ड- गटातून आमदार महेश लांडगे यांचे समर्थक राजेंद्र लांडगे यांनी 9 हजार 819 मतांनी विजय मिळवला होता. त्यांनी अपक्ष लढलेले योगेश गवळी आणि शिवसेनेच्या तिकीटावर लढलेले विशाल लांडगे यांचा पराभव केला होता.

2017 च्या आरक्षणानुसार, अ- अनुसूचित जमाती- महिला, ब- नागरिकांचा मागास प्रवर्ग- महिला, क- सर्वसाधारण आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्के आरक्षण आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ओबीसी आरक्षण पूर्ववत ठेवण्यात आले आहे. वास्तविक, शहरात अनुसूचित जमातीचे आरक्षण एकूण 5 प्रभागांत आहे. त्यापैकी 3 प्रभागात उमेदवारी दिली जाते. त्यामध्ये चक्राकार पद्धतीने आरक्षण निश्चित केले जाते. त्यामुळे या प्रभागतील अ-गटाचा अनुसूचित जमातीचे आरक्षण खुले होणार आहे. सदरची जागा ओबीसी किंवा सर्वसाधारण गटासाठी राहणार आहे.

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे :

1. **भारतीय जनता पार्टी :** राजेंद्र लांडगे, योगेश लांडगे, सचिन लांडगे, विशाल लांडगे.
2. **राष्ट्रवादी अ.प. गट :** सारिका लांडगे, संतोष लांडगे.
3. **शिवसेना शिंदे गट :** अद्याप कोणी नाही.
4. **राष्ट्रवादी श.प. गट :** अद्याप कोणी नाही.
5. **शिवसेना उबाठा गट :** रवि लांडगे.
6. **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** अद्याप कोणी नाही.
7. **महाराष्ट्र नवनिर्माण सेना :** सीमा बेलापूरकर.

### प्रभागातील समाविष्ट भाग :

धावडेवस्ती, भगतवस्ती, गुळवेवस्ती, चक्रपाणी वसाहत भाग, पांडवनगर, रोशल गार्डन, सदगुरूनगर आदी.

### 2017 मधील विजयी उमेदवार :

अ - यशोदा बोईनवाड - भाजपा
ब - सारिका लांडगे - भाजपा (आता राष्ट्रवादी अ.प.)
क- रवि लांडगे - भाजपा (आता शिवसेना उबाठा)
ड - राजेंद्र लांडगे - भाजपा.

## 3 हजार ढोल, 1 हजार ताशा अन् 500 हून अधिक भगवा ध्वज

# ‘स्टच्यू ऑफ हिंदुभूषण’ला ऐतिहासिक गगनभेदी मानवंदना

## हिंदूभषण स्मारक ट्रस्टच्या पुढाकाराने राज्यातील लक्षवेधी सोहळा

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे संपूर्ण जगाला हेवा वाटावा असे भव्य-दिव्य आणि सर्वांत उंच पूर्णाकृती शिल्प अर्थात “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत आहे. भगवा ध्वज हा शौर्याचे आणि स्वाभिमानाचे प्रतिक असून, या ध्वजाला आणि भगव्याच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शंभुराजांच्या कार्याला मानवंदना देण्यासाठी ढोल-ताशा ऐतिहासिक अन् गगनभेदी निनाद सोहळा आयोजित केला आहे.**




बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जागेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि राज्य सरकारच्या मान्यतेने छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती शिल्प आणि शंभुसृष्टी उभारण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार तथा हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हे अतिभव्य स्मारक उभारले जात आहे.

महाराष्ट्रामध्ये ढोल-ताशा या पारंपरिक वादन सोहळ्याला विशेष महत्त्व आहे. ‘राज्य उत्सव’ म्हणून घोषित केलेल्या गणेशोत्सवात ढोल-ताशा पथकांनी अवघ्या देशाचे लक्ष वेधून घेतले. परंपरा आणि संस्कृती जपणाऱ्या ढोल-ताशा महासंघाच्या वतीने जगातील सर्वात उंच शिल्प “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” ला मानवंदना देण्याचा संकल्प मांडला होता. त्यानुसार, रविवार, दि. 14 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे ऐतिहासिक मानवंदना सोहळा होणार आहे. तसेच, येत्या दि. 2 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी महाराज पूर्णाकृती शिल्पाच्या तलवारीचे शस्त्रपूजन करण्यात येणार आहे, अशी माहिती हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांनी दिली.

### शिव-शंभुप्रेमींना आवाहन...

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पराक्रमी पुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय ऐतिहासिक कार्याला ढोल-ताशांची ही मानवंदना अर्पण केली जाणार आहे. त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या आणि धर्मरक्षणाच्या संघर्षमय कार्याचा जागर या माध्यमातून घडणार आहे. शिव-शंभूंचा विचार संपूर्ण जगभर पोहोचवण्याचा संकल्प हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने केला आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील शिव-शंभुप्रेमींमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कारण, तब्बल 3 हजार ढोल, 1 हजार ताशा आणि 500 भगवे ध्वज यांसह ऐतिहासिक आणि गगनभेदी मानवंदना होणार आहे. मराठ्यांच्या इतिहासावर आधारित रोमांचक गीतांची

SANT SAI ENGLISH MEDIUM SCHOOL BHOSARI
ACHIEVEMENT THROUGH EFFORTS
ESTD. : 1990
(Recognised by Govt. of Maharashtra)

**SANT SAI PRE-PRIMARY SCHOOL**

**ADINATH NAGAR, GAVHANE VASTI, BHOSARI, PUNE - 411039**

**“Grandparents Meet”**

*(“Grandparents hold our hands for just a little while, but our hearts forever”)*





Organised by



12th Sept, 2025 (Friday)

Time : 1.00 p.m.

Venue: Sant Sai High School
Adinathnagar, Bhosari, Pune - 39

**Shri. Shivling N. Dhawaleshwar**
(Founder & Principal)

**Ms. Payal Dhawaleshwar**
(Trustee)

## हिंदी दिन अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरा

# विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून हिंदी भाषेच्या सौंदर्याची प्रचीती

### शिक्षण विश्व : विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूलमध्ये हिंदी दिन अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. प्री-प्रायमरीपासून ते उच्च वर्गांपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध रंगीबेरंगी कार्यक्रम सादर करून आपली प्रतिभा उजागर केली.**




या विशेष दिवशी विद्यार्थ्यांनी भावस्पर्शी गीते, कवितांचे सादरीकरण, तसेच कबीर यांचे दोहे सादर करत हिंदी भाषेच्या सौंदर्याची प्रचीती उपस्थितांना दिली. विद्यार्थ्यांनी हिंदी दिनाचे महत्त्व सांगत भाषेप्रती आदर आणि आत्मीयता व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी अर्थपूर्ण भाषांतराद्वारे आपल्या भाषिक कौशल्याचाही परिचय दिला.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन हिंदी विषयाच्या शिक्षिका वर्षा धावडे यांनी केले.

---

## मोशीतील मूर्ती संकलन उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

### अतिश बारणे यांची संकल्पना; 3,800 गणेश मूर्तींचे संकलन

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या गणेश मूर्ती संकलन या उपक्रमांतर्गत यंदाच्या गणेशोत्सवात 3,800 मूर्ती संकलित करण्यात आल्या आहेत.पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या गणेश मूर्ती संकलन उपक्रमास मोशी परिसरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.**



आतिश बारणे यांच्या पुढाकारातून सुरू केलेल्या या उपक्रमाला दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रतिसाद मिळाला. गणेश विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली होती. विसर्जनासाठी घरगुती गणपतीसह सार्वजनिक मंडळांनीही या पर्यावरणपूरक संकल्पनेला प्रतिसाद दिला. या उपक्रमांतर्गत संकलित मूर्तींचे शास्त्रोक्त पद्धतीने आणि पर्यावरणपूरक रीतीने विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवसापासूनच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर या मूर्ती संकलन केंद्रांचा लाभ घेतला.

या उपक्रमामुळे नागरिकांना सुलभ व सुरक्षित विसर्जनाची सुविधा उपलब्ध झाली असून, परिसरात जलप्रदूषण टाळण्यास मदत झाली आहे. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल स्थानिक नागरिकांनी अतिश बारणे यांचे आभार मानले असून, असे उपक्रम पुढील काळातही सुरू राहावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046